स्टडी सर्कलद्वारा प्रकाशित

# स्पर्धा परीक्षा


संपादक : डॉ. आनंद पाटील

नोकरी-संदर्भ

Jan WK4





## पद्म पुरस्कार २०२३



डॉ. दिलीप महालनाबिस | बालकृष्ण दोशी | मुलायम सिंह यादव | उस्ताद जाकिर | एसएम कृष्णा | श्रीनिवास वर्धन










## विशेष मार्गदर्शन

## पोलीस भरती

A Study Circle Publication

# स्पर्धा परीक्षा
नोकरी संदर्भ
# SPNS

The Title *"SPARDHA PARIKSHA NOKARI SANDHARBHA"* or *"SPARDHA PARIKSHA NOKARI SANDHARBHA GENERAL KNOWLEDGE"* is published by Dr. Anand B. Patil © for Study Circle Publication (P) Ltd. This magazine is a copyright. No part thereof shall be copied by anyone by any means without prior permission of the Publisher.

**RNI NO. MAHBIL / 2003/10451**

वर्ष : २१ **WK-IV** किंमत १० रु.

जानेवारी २०२३

अध्यक्ष आणि मानद संपादक
**डॉ. आनंद पाटील**

कार्यकारी आणि व्यवस्थापकीय संपादक
**सौ. वैशाली पाटील**

**ADVISORY COUNCIL**
Dr. Vijay Bhatkar, Prin. Vasantrao Wagh
Prin. Beena Inamdar, Vitthalrao Jadhav
**Satish Pawar**

**DESIGNAL & LAYOUT**
Study Circle Mumbai DTP Team

**EDITORIAL & HEAD OFFICE**
Editor, SPNS. 3-4, Amit Complex, 474/B, Opp. New English School, Tilak Road, Sadashiv Peth, Pune - 30. Phone No. 4486245.

**CORPORATE OFFICE**
Study Circle, 102, Deecan Vihar, B.S. Road, Dadar (W), Mumbai - 028.
Phone No. 24362656 Fax : 24325827.

*e-mail :* studycircleonline2020@gmail.com

*visit us at www.studycircleonline.com*

*© Strictly reserved with the Publishers*

## अंतरंग

- संपादकीय .............................. ३
- ७४ वा प्रजासत्ताक दिवस ............... ६
- पद्म पुरस्कार २०२३ ................. ११
- स्वदेशी मोबाईल ऑपरेटिंग सिस्टीम ............................... १६
- पंतप्रधान स्वनिधी योजना ............ १७
- ख्रिस हिपकिन्स न्यूझीलंडचे नवे पंतप्रधान ............ १९
- महिलांसाठी अनुकूल शहरे ............ २०
- पोलर प्रीतचा विक्रम ................. २३
- पोलीस भरती लेखी परीक्षा मार्गदर्शन शब्दविचार, जाती व नाम ............ २५
- महत्त्वाचे –
  ✲ धर्म सेन्सॉर बोर्डाची स्थापना .... १०

Printed by Dr. Anand B. Patil STUDY CIRCLE PUBLICATIONS PVT. LTD. at Navbharat Press, Polt No. 13, Sector-8, Sanpada (E), Navi Mumbai - 400 706.

# संपादकीय



## "असाध्य ते साध्य करिता सायास ।
## कारण अभ्यास तुका म्हणे ।"

अगस्ती ऋषींनी त्यांच्या आश्रमात ज्ञानार्जन करू इच्छिणाऱ्या तीन शिष्यांची परीक्षा घ्यायचे ठरविले होते. एकदा त्यांनी एका वनौषधीचा रस त्या तिघांना प्यायला सांगितला वर रस पिऊन झाल्यानंतर त्यांच्या गुणधर्माबद्दल व उपयुक्ततेबद्दल प्रत्येकास अभिप्राय व्यक्त करण्याचा आदेश दिला. ऋषींच्या आज्ञेप्रमाणे प्रत्येकाने रस पिण्यास सुरुवात केली. थोडा रस पिऊन होताच पहिल्या शिष्याने आश्रमाबाहेर जाऊन उलटी केली आणि तो ऋषींना म्हणाला – ''गुरुवर्य, हा रस खूपच कडवट असून त्याचा एक थेंबही मी पिऊ शकणार नाही.'' दुसऱ्या शिक्षष्यानेही पहिल्याचे अनुकरण करून गुरुवर्यांना सांगितले की – ''मला वाटते की याच्यापेक्षा जास्त कडवट वस्तू जगामध्ये असूच शकणार नाही.'' शेवटी तिसऱ्या शिष्याची पाळी आली. त्याने आनंदाने त्या रसाचे ग्रहण केले व तो ऋषींना म्हणाला – ''गुरुवर्य, आपण दिलेला रस खूपच चविष्ट असून तो तुम्ही दिलेला प्रसाद असल्याने चांगला व उपयुक्त आहे.'' गुरुवर्यांचे यावर प्रत्युत्तर – ''वत्सा, ते अगदी बरोबर आहे. या रसात अतिशय उच्च प्रतीचे गुण असून तो बुद्धी व स्मरणशक्ती वाढविण्यास खूपच उपयुक्त आहे.'' परंतु या सर्व प्रकारामागे त्या रसाची उपयुक्तता शोधण्यापेक्षा ऋषींना त्यांच्या शिष्यांतील आज्ञाधारकपणा, सहनशीलता आणि चातुर्य वैशिष्ट्ये शोधायची होती. शेवटी ते त्या तिघांनाही म्हणाले – ''सत्य आणि ज्ञानसाधना

ही सुरुवातीला फारच कडवट आणि कष्टप्रद असतात पण त्यांच्या साहाय्याने होणारा शेवट हा नेहमीच गोड आणि सुखकारक असतो.'' आपण सर्वांनाच माहीत आहे की – "Truth has a bitter beginning but sweeter end."

**सुखार्थी चेतू त्यजेद् विद्यां विद्यार्थी चेत् त्यजेत् सुखम्।**

**सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम्।।**

ज्याला विद्या मिळविण्याची इच्छा आहे त्याने 'सुखा'ची इच्छा धरू नये. आराम, झोप, चैन, गप्पाटप्पा, टीव्ही, नाटक, सिनेमा, क्रिकेट, टेबलटेनिस सारखे खेळ, या गोष्टीत जास्त वेळ घालविणाऱ्याला विद्या प्राप्त होणार नाही. ही सारी सुखे हवी असतील तर विद्येची आशा नको. विद्या हवी असेल तर या सुखांची आकांक्षा नको. दोन्ही गोष्टी एकाचवेळी साधणार नाहीत. – 'You cannot have the cake and eat it too.'

पुष्कळ विद्यार्थी विचारतील – पण ही विद्या मिळवायलाच हवी का? अभ्यास करायलाच पाहिजे का? आजकाल बऱ्याचजणांना शिक्षण नसून दरमहा भरपूर पगार मिळताना दिसतो. थोडाफार अभ्यास करून बरेचजण PSI होतात. बोरीबंदरवरचे हमालसुद्धा रोज १०० रुपयांपासून १००० रुपयांपेक्षा जादा रक्कम मिळवितात. पानाची गादी चालविणारेसुद्धा शेकडो रुपये मिळवितात! ते कुठे अभ्यास करतात?

असा विचार करण्यात आपण दोन चुका करीत आहोत. या साऱ्यांना विचारून पहा, आपण शिकू शकलो नाही याचे त्यांना अंतर्यामी फार दुःख आहे आणि PSI होण्यासाठी आपण अजून अभ्यास करायला हवा होता असे त्यांना वाटते. आपल्या मुलाबाळांनी शिकावे यासाठी ते धडपडत असतात. केवळ पैसा मिळविला, खाणे–पिणे, कपडालत्ता मिळाला की माणूस सुखी होत नाही.

दुसरी चूक अशी की यांना काही अभ्यास करावा लागत नाही हा आपला चुकीचा समज आहे. पानाच्या गादीवर बसणाऱ्यालासुद्धा पानांच्या जाती, सुपारी,

तंबाखूचे प्रकार, रोजचे बदलते बाजारभाव, गिऱ्हाईकांच्या आवडीनिवडी वगैरे अनेक गोष्टींचा अभ्यास करावा लागतो, त्यामुळेच त्यांना धंद्यात यश मिळते.

लहान वयात आपल्याला अनेक गोष्टी शिकायच्या असतात. मोठेपणी जगात वावरताना लहानपणी मिळविलेले शिक्षणच उपयोगी पडते. मातृभाषा, राष्ट्रभाषा. इंग्रजीसारखी आंतरराष्ट्रीय भाषा वगैरे, गणित, शास्त्रे यासारखी नित्य उपयोगी पडणारी शास्त्रे, आपल्या राष्ट्राचा व संस्कृतीचा इतिहास, आपल्या परिसराचा व जगाचा भूगोल या केवळ पुस्तकी विषयांचाच नव्हे तर अर्थशास्त्र, सामान्यज्ञान लोकव्यवहार, संभाषण कला, हिशेब मांडणी वगैरे गोष्टींचा अभ्यास विद्यार्थ्याला भावी काळात आणि स्पर्धा परीक्षांसाठी उपयोगी पडतो. सर्वात मुख्य म्हणजे कोणत्याही गोष्टीचा विचार करताना परिस्थितीचा व विषयाचा अभ्यास करून त्याबद्दल योग्य निर्णय घेण्याची शिस्त माणसाला लागते व मग तुम्हाला 'अशक्य' काहीच वाटत नाही.

**– डॉ. आनंद पाटील,**
**संचालक, स्टडी सर्कल**

# ७४ वा प्रजासत्ताक दिवस







२६ जानेवारी २०२३ रोजी समस्त भारताने ७४वा प्रजासत्ताक दिवस मोठ्या दिमाखात साजरा केला. प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फतेह अल–सीसी उपस्थित होते. करोना संसर्गामुळे २०२१ आणि २०२२ या दोन वर्षी प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्यासाठी भारताकडून कोणत्याही देशाच्या नेत्याला प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले नव्हते.

परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी इजिप्तला दिलेल्या भेटीदरम्यान अब्देल फतेह अल –सीसी यांना भारताकडून औपचारिक आमंत्रण दिले होते. यंदा इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष अब्देल फतेह अल–सीसी हे प्रजासत्ताक दिनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून भारतात आले असून, पंतप्रधान मोदींसोबत त्यांची द्विपक्षीय बैठक झाली.

या बैठकीत दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारीस नव्याने पुढे नेण्यावर सहमती झाली. बैठकीच्या चर्चेचा मुख्य मुद्दा द्विपक्षीय संबंधांना धोरणात्मक भागीदारीच्या रुपात पुढे नेणे आहे. ज्यामध्ये चार प्रमुख स्तंभ आहेत, राजकीय आणि सुरक्षा सहकार्य, आर्थिक सहभाग, वैज्ञानिक आणि शैक्षणिक सहकार्य, व्यापक सांस्कृतिक आणि लोकांमधील संपर्क यांचा समावेश आहे.

७४ व्या गणतंत्र दिवसाचे औचित्य साधत दिल्लीतल्या कर्तव्य पथावर गणतंत्र दिवसाची कवायत पार पडली. ***इजिप्तचे राष्ट्रपती अब्देल फतल अल सिसी*** हे या वर्षी गणतंत्र दिवसाचे प्रमुख पाहुणे होते. राफेल या लढाऊ

विमानांची प्रात्यक्षिकं या वर्षीचा गणतंत्र दिवस सोहळ्यात पाहण्यास मिळाली. कर्तव्य पथ या पथाचं नाव आधी राजपथ असं होतं. आज याच ठिकाणी सैन्याच्या तिन्ही दलांचं संचलन पार पडलं.



या कवायतीची सुरूवात इजिप्तच्या सशस्त्र दलाच्या एका कवायतीने झाली. यामध्ये इजिप्तच्या सशस्त्र दलांचं प्रतिनिधीत्व करणारे १४४ सैनिक सहभागी झाले होते. केंद्रीय राखी पोलीस दलाच्या महिलांच्या तुकडीनेही कवायत केली. एका महिला अधिकाऱ्याच्या नेतृत्त्वात नौदलाच्या तीन महिला आणि सहा अग्नीवीर सहभागी झाले होते. न्यूज १८ ने या संदर्भातलं वृत्त दिलं आहे. ***आत्मनिर्भरता हाच आदर्श*** आहे हे वाक्य सार्थ ठरवण्यात आल्याचं कवायतीत दिसलं. भारतात निर्मिती करण्यात आलेले अर्जुन आणि आकाश या क्षेपणास्त्र या कवायतीत सहभागी झाली होती. तसंच भारतीय निर्मितीची अनेक शस्त्रही या परेडमध्ये दाखवली गेली

**कवायतींमध्ये २३ चित्ररथ सहभागी –** ७४व्या गणतंत्र दिवसाच्या परेडमध्ये एकूण २३ चित्ररथ सहभागी झाले होते. ज्यामध्ये १७ राज्यं आणि सात केंद्रशासित प्रदेश आणि सहा विविध सरकारी मंत्रालयांचा सहभाग होता. भारताची संस्कृती, आर्थिक प्रगती आणि राष्ट्रीय सुरक्षा हे विषय या चित्ररथांसाठी निवडण्यात आले होते. राष्ट्रव्यापी वंदे मातर या नृत्य स्पर्धेच्या माध्यमातून निवडण्यात आलेल्या ४७९ कलाकारांनी सांस्कृतिक नृत्यं सादर केली.

कोर ऑफ सिग्नल्सच्या डेअर डेविल्स द्वारे मोटरसायकलची प्रात्यक्षिकं दाखवली. साहस, कला, संस्कृती, खेळ, समाजसेवा या क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या लहान मुलांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते राष्ट्रीय बाल पुरस्कारही प्रदान करण्यात आला.

गणराज्य दिवसाच्या निमित्ताने विविध विमानांची हवाई प्रात्यक्षिकंही सादर करण्यात आली आहेत. यामध्ये तिन्ही दलाच्या विमानांनी सहभाग घेतला. ४५ विमानांच्या एअर शोमध्ये व्हिंटेज विमानांनासह भारतीय वायू सेनेतली आधुनिक विमानंही सहभागी झाली होती. राफेलची नऊ विमानं या प्रात्यक्षिकांमध्ये सहभागी झाली होती. राफेल विमानांनी व्हर्टिकल चार्ली हे प्रात्यक्षिक दाखवलं.

**महाराष्ट्राचा चित्ररथ –** महाराष्ट्राने यापूर्वी ४० वेळा राजधानी दिल्लीत मुख्य पथसंचलनात चित्ररथ सादर केलेला आहे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवी वर्षानिमित्त यावेळी साडेतीन शक्तीपीठे आणि नारीशक्ती ही संकल्पना सादर केली आहे. या माध्यमातून महाराष्ट्रातील पुरातन मंदिरे आणि महिलांचे कर्तुत्व या गोष्टीला सर्वांच्या समोर आणता येतील, अशी प्रतिक्रिया सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांनी दिली होती.




महाराष्ट्र हा संत, देवदेवतांची भूमी आहे. महाराष्ट्रात ज्याप्रकारे अनेक समाजसुधारक होऊन गेली, तशीच महाराष्ट्राला मोठी धार्मिक परंपरा राहिली आहे. कोल्हापूरची अंबाबाई, तुळजापूरची तुळजाभवानी, माहूरची रेणुकामाता हे तीन पूर्ण शक्तीपीठे आहेत. तर वणीची सप्तश्रृंगी हे अर्धे शक्तिपीठ आहे. या शक्तिपीठांचे दर्शन दिल्लीतील पथसंलनात सर्वांना घेता आले.

# आपणांस माहित आहे का?

## २६ जानेवारी आणि १५ ऑगस्टच्या ध्वजारोहणातील फरक



२६ जानेवारीला खूप महत्त्व आहे. १९३० मध्ये या दिवशी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्य घोषित केले आणि हा दिवस भारतातील जनतेला लोकशाही पद्धतीने सरकार निवडण्याच्या शक्तीची आठवण करून देतो. हा राष्ट्रीय सण देशात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो आणि या दिवशी राष्ट्रीय सुट्टी असते. आपल्या भारतात या दोन खास दिवशी तिरंगा फडकवला जातो. पण स्वातंत्र्यदिन आणि प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करण्यात नेमका फरक काय आहे याची जाणिव प्रत्येक देशवासीयाने ठेवली पाहिजे.

२६ जानेवारी हा दिवस देशात संविधानाच्या अंमलबजावणीच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. या दिवशी संविधान प्रमुख राष्ट्रपती ध्वज फडकावतात. १५ ऑगस्ट म्हणजेच स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वज खालून दोरीने वर खेचला जातो, नंतर तो उघडला जातो आणि फडकवला जातो, याला ध्वजारोहण म्हणतात. हे १५ ऑगस्ट १९४७ च्या ऐतिहासिक घटनेचा सन्मान करण्यासाठी केले जाते. घटनेत याला ***ध्वजारोहण*** असे म्हणतात.

२६ जानेवारी म्हणजेच प्रजासत्ताक दिनानिमित्त, ध्वज शीर्षस्थानी बांधलेला असतो, जो उघडला जातो आणि फडकवला जातो. घटनेत याला ***ध्वजांकित*** म्हणतात. स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून ध्वजारोहण केले जाते. त्याचवेळी प्रजासत्ताक दिनी राजपथावर ध्वजारोहण केले जाते. देशात प्रजासत्ताक दिन उत्साहात आणि थाटामाटात साजरा केला जातो. देशभरात अनेक कार्यक्रम आहेत. या दिवसातील सर्वात आकर्षक सोहळा म्हणजे दिल्लीतील राजपथ येथे आयोजित भव्य परेड जी इंडिया गेटपर्यंत जाते. देशाचे राष्ट्रपती राजपथावर ध्वजारोहण करतात.

महाराष्ट्राच्या चित्ररथाच्या पुढील दर्शनीय भागात गोंधळी संबळ वाद्य वाजवित असल्याची मोठी प्रतिकृती आहे. समोरच्या डाव्या व उजव्या भागास पारंपरिक वाद्य वाजविणारे आराधी, गोंधळी यांच्या प्रतिमा आहेत. त्यामागे शक्तिपीठांची मंदिरे असून त्यात देवींच्या प्रतिमा आहेत. मागच्या बाजूस पोतराज आणि हलगी वाजविणाऱ्या भक्तांची मोठी प्रतिकृती आहे. तर मधल्या जागेत लोककलाकार आराधी, पोतराज हे लोककला सादर करणार आहेत. तर शेवटी मागच्या बाजूस नारी शक्तीचे प्रतिनिधीत्व करणारी एक मोठी स्त्रीप्रतिमा दिसत आहे.

या चित्ररथाची संकल्पना सांस्कृतिक कार्य संचालनालयाची आहे. ङ्गशुभ डफया संस्थेने चित्ररथाला मूर्त स्वरुप देण्याचे काम केले. संगीतकार कौशल इनामदार यांनी चित्ररथात साडेतीन शक्तीपीठांचा महिमा सांगणारे गीत संगीतबद्ध केले आहे. तर प्राची गडकरी यांनी हे गीत लिहिले आहे. व्हिजनरी परफॉर्मिंग कला समूह, या संस्थेच्या कलाकारांनी या चित्ररथावर नृत्य कला सादर केली आहे. ●●●

महत्त्वाचे

## धर्म सेन्सॉर बोर्डाची स्थापना



प्रयागराजमध्ये धर्म सेन्सॉर बोर्डाची स्थापना करण्यात आली आहे. हिंदू देवी–देवतांचा अपमान रोखण्यासाठी उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथे माघ मेळाव्याला उपस्थित असणाऱ्या संतानी धर्मा सेन्सॉर बोर्डाची स्थापना केली आहे. चित्रपट व वेबसिरीजमध्ये देवी–देवतांचा अपमान होऊ नये. यावर आता धर्म सेन्सॉर बोर्ड लक्ष ठेवणार आहे. शंकराचार्य अविमुक्तेश्वरानंद सरस्वती या धर्म सेन्सॉर बोर्डाचे अध्यक्ष असतील. या सेन्सॉर बोर्डात १० सदस्यांचा समावेश असेल. बोर्डाकडे आलेल्या तक्रारी संबंधित चित्रपट आणि वेबसिरजीची हे बोर्ड पाहणी करेल.

# पद्म पुरस्कार २०२३




भारत सरकारने प्रजासत्ताकदिनाच्या पूर्वसंध्येला पद्म पुरस्कारांची घोषणा केली आहे. यावेळी केंद्र सरकारने एकूण १०६ पद्म पुरस्कार जाहीर केले आहेत. यामध्ये समाजवादी पक्षाचे दिवंगत नेते मुलायमसिंह यादव तसेच ओआरएसचे निर्माते दिलीप महालनाबिस यांना मरणोत्तर पद्मविभूषण तर ९१ जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

केंद्र सरकारने एकूण १०६ पद्म पुरस्कारांपैकी ६ जणांना पद्मविभूषण, ९ जणांना पद्मभूषण तर ९१ जणांना पद्मश्री पुरस्कार जाहीर केला आहे. यामध्ये १९ मान्यवर महिला आहेत. तर यामध्ये २ एनआरएय, परदेशी नागरिकांचा समावेश आहे. ७ जणांना मरणोत्तर पुरस्कार जाहिर झाले.

एकूण ९ जणांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झालेला आहे. यामध्ये सुधा मूर्ती, कुमार मंगलम बिर्ला या मान्यवरांचा समावेश आहे. तर ९१ मान्यवरांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. यामध्ये आरआरआर चित्रपटाचे संगीतकार कीरावानी, अभिनेत्री रविना टंडन आदींचा समावेश आहे.

औषधनिर्माण क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्यामुळे ओआरएसचे निर्माते दिलीप महालनाबीस यांना पद्मविभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. पद्म पुरस्कार मिळणाऱ्या मान्यवरांमध्ये महाराष्ट्रातील परशुराम कोमाजी खुने यांचा समावेश असून त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ते मूळचे गडचिरोली जिल्ह्यातील आहेत. त्यांनी आतापर्यंत ५००० नाटकांच्या प्रयोगांमध्ये ८०० पेक्षा जास्त भूमिका केलेल्या आहेत. तसेच महाराष्ट्रातील प्रभाकर भानुदास मांडे यांना आपल्या साहित्य आणि शिक्षण

# पद्म पुरस्कार २०२३



क्षेत्रातील योगदानामुळे तर गजानन माने यांना समाजसेवेमुळे पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. नुकतेच निधन झालेले राकेश झुनझुनवाला (महाराष्ट्र,) यांनादेखील मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे.

**पद्मविभूषण पुरस्कार** – मुलायमसिंह यादव (मरणोत्तर), दिलीप महालनाबीस (मरणोत्तर), झाकीर हुसेन, एसएम कृष्णा , श्रीनिवास वर्धन, बालकृष्ण दोशी

***शौर्य पुरस्कार २०२३–*** प्रजासत्ताक दिनाच्या दिनानिमित्त ९०१ पोलीस कर्मचाऱ्यांचा पोलीस पदक जाहीर करण्यात आले आहे. यापैकी १४० पोलीस कर्मचाऱ्यांचा शौर्यासाठी पोलीस पदक जाहीर करून त्यांचा गौरव करण्यात आला आहे. तर ९३ पोलीस कर्मचाऱ्यांना विशेष सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर करण्यात आलं आहे. याशिवाय गुणवत्तापूर्ण सेवेसाठी ६६८ पोलीस कर्मचाऱ्यांना पोलीस पदक जाहीर झालं आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येस केंद्रीय गृहमंत्रालयाकडून पोलीस पदकांची घोषणा करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील ३१ पोलिसांना शौर्य पोलीस पदक जाहीर झाले आहे. तसेच, चार अधिकाऱ्यांना राष्ट्रपती पोलीस पदक आणि ३९ पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांना गुणवंत पोलीस पदक जाहीर झाले आहे.

मुंबईचे विशेष पोलीस आयुक्त देवेन भारती, राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक अनुप कुमार सिंह, मुंबईतील पोलीस उपनिरीक्षक संभाजी देशमुख आणि ठाण्यातील उपनिरीक्षक दीपक जाधव या चार अधिकाऱ्यांचा राष्ट्रपती

पोलीस पदक जाहीर झालेल्यांमध्ये समावेश आहे. याशिवाय नाशिक पोलीस आयुक्तालयाच्या मध्यवर्ती गुन्हेशाखेचे सहायक पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय कडनोर यांना गुणवंत पोलीस पदक जाहीर झाले आहे. याशिवाय परिक्षेत्रातील सुखदेव मुरकुटे यांनाही गुणवंत पोलीस पदक जाहीर झाले आहे.

ज्या पोलीस कर्मचाऱ्यांना शौर्य पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे, त्या १४० कर्मचाऱ्यांपैकी ८० जण हे डाव्या विचारसरणीचा प्रभाव असलेल्या, दहशतग्रस्त भागात सेवा बजावणारे आहेत. शौर्य पदक प्राप्त करणाऱ्यांमध्ये सीआरपीएफचा अव्वल क्रमांक असून त्यांनी ४८ पदकं मिळवली आहेत. तर महाराष्ट्राने ३१ पदकं मिळवली आहेत. जम्मू-काश्मीर -२५, झारखंड -९, दिल्ली, छत्तीसगड, बीएसएफचे सात-सात जवान आहेत. उर्वरित जवान अन्य राज्य, केंद्रशासित प्रदेश आणि सीएपीएफचे आहेत.

याशिवाय, ५५ जवानांना होमगार्ड व सिविल डिफेंस मेडलने सन्मानित करण्यात आलं आहे. हे शौर्य पदक होमगार्ड आणि नागरिक सुरक्षेसाठी जवानांच्या शौर्यासाठी दिले जाते. उत्कृष्ट सेवा आणि नागरी संरक्षणासाठी राष्ट्रपतींच्या हस्ते विशिष्ट सेवा आणि नागीर संरक्षण पदक प्रदान केले जाते. हे पदक ९ जवानांना गुणवत्तापूर्ण सेवेसाठी आणि ४५ जवानांना नागरी संरक्षणासाठी दिले जाते.

## आपणांस माहित आहे का?

**पद्म पुरस्कार निवड प्रक्रिया -**

२५ जानेवारी २०२३ रोजी सरकारने एक पद्मविभूषण आणि २५ पद्मश्री पुरस्कारांची घोषणा केली. दिलीप महालनाबिस यांना औषध (बालरोग) क्षेत्रात मरणोत्तर पद्मविभूषण प्रदान करण्यात येणार आहे. पद्म पुरस्कार हे भारतरत्न नंतरचे भारतातील सर्वोच्च नागरी सन्मान आहेत, ज्यात सार्वजनिक सेवेचा घटक असलेल्या सर्व क्षेत्रातील कामगिरीसाठी गौरवले जाते.

**पद्म पुरस्कारांचा इतिहास -** भारताचे सर्वोच्च नागरी सन्मान म्हणून भारतरत्न आणि पद्मविभूषण हे दोन पुरस्कार १९५४ मध्ये प्रथम घोषित करण्यात आले.

पद्म विभूषण पुरस्काराचे तीन वर्ग आहेत ज्यांना १९५५ मध्ये पद्मविभूषण (पहिला वर्ग), पद्मभूषण (द्वितीय वर्ग) आणि पद्मश्री (तृतीय वर्ग) असे नाव देण्यात आले.

भारतरत्न हा सर्वोच्च नागरी पुरस्कार असून आजपर्यंत केवळ ४५ भारतरत्नांनाच पद्म पुरस्कार प्रदान केले जातात. १९७८–१९७९ आणि १९९३–१९९७ मधील अपवाद वगळता, दरवर्षी प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला पुरस्कार प्राप्तकर्त्यांची नावे जाहीर केली जातात.

सामान्यतः, एका वर्षात १२० पेक्षा जास्त पुरस्कार दिले जात नाहीत, परंतु यामध्ये मरणोत्तर पुरस्कार किंवा अनिवासी भारतीय आणि परदेशी नागरिक यांना दिले जाणारे पुरस्कार समाविष्ट नाहीत. हा पुरस्कार सामान्यतः मरणोत्तर बहाल केला जात नसला तरी सरकार अपवादात्मक परिस्थितीत मरणोत्तर सत्काराचा विचार करू शकते.

१९५४ मध्ये पहिल्यांदा शास्त्रज्ञ सत्येंद्र नाथ बोस, कलाकार नंदलाल बोस, शिक्षणतज्ञ आणि राजकारणी झाकीर हुसेन, सामाजिक कार्यकर्ते व राजकारणी बाळासाहेब गंगाधर खेर, शैक्षणिक तज्ज्ञ व्ही.के. कृष्ण मेनन यांना पद्मविभूषण पुरस्काराने गौरवण्यात आले होते. भूतानचे राजे जिग्मे दोरजी वांगचुक हे पहिले–पद्मविभूषण पुरस्कार विजेते परदेशी नागरिक होते.

***पद्म पुरस्कारांचे स्वरूप*** – भारताचे राष्ट्रपती, राष्ट्रपती भवनात पुरस्कार प्रदान करतात. पुरस्कार विजेत्यांना कोणतेही रोख पारितोषिक मिळत नाही परंतु राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र आणि पदक दिले जाते. पुरस्कार विजेते हे पदक सार्वजनिक आणि सरकारी समारंभात घालू शकतात. मात्र पद्म पुरस्कार हे शीर्षक म्हणून प्रदान केलेले नाहीत आणि पुरस्कार विजेत्यांनी त्यांच्या नावास उपसर्ग किंवा प्रत्यय म्हणून त्यांचा वापर करता येत नाही.

पद्म पुरस्कारप्राप्त व्यक्तीला उच्च पुरस्कार दिला जाऊ शकतो (म्हणजेच पद्मश्री पुरस्कारप्राप्त व्यक्तीला पद्मभूषण किंवा विभूषण मिळू शकतो).असे पद्मश्री पुरस्कार प्रदान केल्याच्या पाच वर्षानंतरच होऊ शकते.

***पद्मश्री पुरस्कारांचे निवड क्षेत्र*** – कला, सामाजिक कार्य, सार्वजनिक व्यवहार, विज्ञान आणि अभियांत्रिकी, व्यापार आणि उद्योग, औषध, साहित्य

आणि शिक्षण, नागरी सेवा आणि क्रीडा या काही निवडक श्रेणींमध्ये पुरस्कार दिले जातात. भारतीय संस्कृतीचा प्रसार, मानवी हक्कांचे संरक्षण, वन्यजीव संरक्षण आदींसाठीही पुरस्कार दिले जातात.

***पद्म पुरस्कारांसाठी पात्रता निकष*** – वंश, व्यवसाय, पद किंवा लिंग असा भेद न करता सर्व व्यक्ती या पुरस्कारांसाठी पात्र आहेत. तथापि, डॉक्टर आणि शास्त्रज्ञ वगळता सरकारी कर्मचारी या पुरस्कारांसाठी पात्र नाहीत.पद्म पुरस्कार निवड निकषांनुसार, हा पुरस्कार केवळ ङ्गदीर्घ सेवेसाठीफ नसून विशेष सेवा साठी दिला जातो.

भारतातील कोणताही नागरिक पद्म पुरस्कारांसाठी अन्य व्यक्तीस नामनिर्देशित करू शकतो. एखादी व्यक्ती स्वतःचे नामनिर्देशन देखील करू शकते. सर्व नामांकन ऑनलाइन केले जातात. नामनिर्देशित व्यक्ती किंवा संस्थेच्या तपशीलांसह एक फॉर्म भरला जाईल. नामांकन विचारात घेण्यासाठी संभाव्य पुरस्कारप्राप्त व्यक्तीने केलेल्या कामाचा तपशील देणारा ८०० शब्दांचा निबंध देखील लिहावा जातो.

सरकार दरवर्षी १ मे ते १५ सप्टेंबर दरम्यान नामांकनांसाठी पद्म पुरस्कार पोर्टल सुरु होते. तसेच विविध राज्य सरकारे, राज्यपाल, केंद्रशासित प्रदेश, केंद्रीय मंत्रालये आणि विविध विभागांना नामांकन पाठवण्यासाठी पत्र लिहिते.गृह मंत्रालयानुसार, निवडीसाठी कोणतेही कठोर निकष किंवा फॉर्म्युला देखील नाही. तथापि, एखाद्या व्यक्तीचे काम हे मुख्य निकष आहे.

पद्म पुरस्कारांसाठी प्राप्त झालेली सर्व नामांकने दरवर्षी पंतप्रधानांनी स्थापन केलेल्या पद्म पुरस्कार समितीसमोर ठेवली जातात. पद्म पुरस्कार समितीचे अध्यक्ष कॅबिनेट सचिव असतात आणि त्यात गृह सचिव, राष्ट्रपतींचे सचिव आणि चार ते सहा प्रतिष्ठित व्यक्ती सदस्य म्हणून असतात. समितीच्या शिफारशी पंतप्रधान आणि राष्ट्रपती यांच्याकडे मंजुरीसाठी सादर केल्या जातात. एकदा प्राथमिक निवड झाल्यानंतर, निवडलेल्या पुरस्कार विजेत्यांच्या पूर्ववृत्तांची केंद्रीय एजन्सींच्या सेवा वापरून पडताळणी केली जाते जेणेकरून त्यांच्याबद्दल कोणतीही अनुचित घटना नोंदवली गेली नाही किंवा रेकॉर्डवर आली नाही. यानंतर अंतिम यादी तयार करून जाहीर केली जाते.

# स्वदेशी मोबाईल ऑपरेटिंग सिस्टिम




आयआयटी मद्रासने नाविन्यतेच्या कल्पनेखाली (इनक्युबेटेड फर्म) स्थापन केलेल्या कंपनीने भारोस (बीएचएआरओएस) ही स्वदेशी बनावटीची मोबाईल ऑपरेटिंग सिस्टिम तयार केली आहे. ही सिस्टिम व्यावसायिक वापरासाठीच्या ऑफ दि शेल्फ हँडसेटमध्ये इन्स्टॉल करता येऊ शकते. ज्या कंपन्या आणि संघटनांचे सुरक्षा आणि गोपनियताविषयक धोरण कठोर आहे अशांना भारोसच्या माध्यमातून सेवा पुरविण्यात येते. काही मोजके आणि मोबाईलच्या माध्यमातून अत्यंत संवेदनशील आणि गोपनीय माहितीची देवाणघेवाण होत असते अशा वापरासाठी ही प्रणाली महत्त्वपूर्ण ठरणार आहे. अशा यूजरना फाइव्ह-जी नेटवर्कच्या माध्यमातून खासगी क्लाऊड सेवांचा ॲक्सेस हवा असतो. आयआयटी मद्रासच्या पुढाकाराने स्थापन झालेल्या जेएएनडीके ऑपरेशन्स प्रायव्हेट लिमिटेडफ (जेएएनडीकेओपीएस) या कंपनीने भारोस ही यंत्रणा विकसित केली आहे.

या प्रणालीमुळे यूजरच्या डिव्हाइसमधील ॲपवर त्यांचे अधिक नियंत्रण प्रस्थापित होईल. यूजरना ज्या ॲपवर विश्वास आहे अशांचाच ते वापर करू शकतील. तसेच डिव्हाईसमधील जे फिचर आणि डेटाचा ॲक्सेस ॲपला असावा असे त्यांना वाटते त्याचा ॲक्सेस त्यांना उपलब्ध करून देता येईल. भारोसच्या माध्यमातून नेटिव्ह ओव्हर दि एअर (नोटा) हे अपडेट उपलब्ध करून दिले जाणार असून त्यामुळे यूजरचे डिव्हाईस सुरक्षित राहू शकेल.

नोटा हे आपोआप अपडेट होईल तसेच ते डाऊनलोड आणि इन्स्टॉल देखील होऊ शकेल. यासाठी यूजरला स्वतःहून काही प्रक्रिया करण्याची गरज भासत नाही. यूजरचे डिव्हाईस ऑपरेटिंग सिस्टिमच्या लेटेस्ट व्हर्जनवर काम करेल. त्यामध्ये सिक्युरिटी पॅचेस आणि बग फिक्सेसचा समावेश असेल. एनडीए, पीएएसएस आणि नोटासारख्या घटकांमुळे भारोस यूजरच्या विश्वासाला पात्र ठरेल असे संशोधकांनी म्हटले आहे. प्रायव्हेट ॲप स्टोअर सर्व्हिसेसच्या (पीएएसएस) यूजरला विश्वासार्ह ॲप उपलब्ध होऊ शकतात. यामुळे यूजरला पूर्णपणे सुरक्षित ॲपच वापरासाठी उपलब्ध होतील.

# पंतप्रधान स्वनिधी योजना




करोनाकाळात छोट्या व्यावसायिकांचे हाल झाले. व्यवसायासाठी भांडवल कोठून आणायचे, असा प्रश्न त्यांच्यापुढे होता. त्यावेळी १ जून २०२० रोजी पंतप्रधान स्वनिधी योजना सुरू करण्यात आली.

***पंतप्रधान स्वनिधी योजनेचे स्वरुप –*** करोनाकाळातील हलाखीच्या स्थितीमधून बाहेर पडण्यासाठी पहिल्या वर्षी १० हजार, नियमित कर्ज फेडल्यानंतर २० आणि ५० हजार रुपये कर्ज देण्याची योजना सुरू करण्यात आली. या योजनेतून कोणत्याही तारणाशिवाय कर्ज दिले जाते. व्याजाचा सरासरी दर साडेदहा ते १२ टक्के एवढा असतो. नियमित कर्जफेड करणाऱ्या कर्जदारास सात टक्के व्याज सवलत आहे. डिजिटल व्यवहार केले तर प्रतिवर्ष १२०० रुपये देण्याची तरतूद पंतप्रधान स्वनिधी योजनेत आहे.

देशात या योजनेतून गेल्या डिसेंबर अखेरपर्यंत ४२ लाख जणांना कर्जपुरवठा करण्यात आला. त्यातील ३१ लाख ८५ हजार ६६९ पथविक्रेत्यांना १० हजार रुपयांचा कर्जहप्ता देण्यात आलेला आहे. या योजनेचा सर्वाधिक लाभ मिळवून देण्यात उत्तर प्रदेश सरकारने अधिक पुढाकार घेतल्याची आकडेवारी नुकतीच संसदेच्या हिवाळी अधिवेशनात सादर करण्यात आली. उत्तर प्रदेशात आठ लाख ६४ हजार ३६५ जणांना पहिला, तर एक लाख ३४ हजार पथविक्रेत्यांना २० हजार रुपयांचा कर्ज हप्ता वितरित करण्यात आला. या राज्यात ११२१ कोटी २९ लाख रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले. मध्य प्रदेश हे दुसऱ्या क्रमांकाचे राज्य ठरले असून, अगदी तेलंगणसारख्या तुलनेने लहान असणाऱ्या

राज्यातही पंतप्रधान स्वनिधी योजनेतून ५४४ कोटींपेक्षा अधिकचे कर्ज वितरित झाले आहे. मध्यप्रदेश, गुजरात या राज्यांत पथविक्रेत्यांना दिलेले कर्ज महाराष्ट्रापेक्षा अधिक आहे.

***योजनेची महाराष्ट्रातील सद्यस्थिती*** – राज्य बँकर्स समितीच्या बैठकीत डिसेंबरमधील कर्ज वितरणाच्या माहितीनुसार, राज्यात पंतप्रधान स्वनिधी योजनेत दोन लाख १९ हजार ६१ एवढ्या जणांना १० हजार रुपयांचे कर्ज वितरण करण्यात आले. राज्यात १०, २० आणि ५० हजार रुपयांपर्यंत कर्ज वितरणातून आतापर्यंत केवळ २९७ कोटी १२ लाख रुपयांचे कर्ज देण्यात आले. ज्या मुंबई, उपनगरे आणि ठाणे जिल्ह्यात पथविक्रेत्यांची संख्या अधिक आहे तिथे कर्जवितरण कमी झाले. बृहन्मुंबईमधून आलेल्या ५२ हजार ३१८ अर्जांपैकी नऊ हजार ४६ जणांना कर्ज वितरण करण्यात आले. तर ठाणे जिल्ह्यात कर्जाची मागणी केलेल्या ७९ हजार ४९७ जणांपैकी २३ हजार ८९१ जणांना कर्ज वितरण करण्यात आले.

बँक व्यवहारात पथविक्रेता आला तर त्याची पत वाढेल, छोटा व्यवसाय करणाऱ्यांना कर्ज मिळण्याची प्रक्रिया सुलभ होईल. मात्र, कर्ज आणि अनुदान यातील फरक समजावून सांगण्यात बँक प्रशासनाला अपयश येते. आलेली रक्कम अनुदान आहे, अशीच सर्वसामान्यांची धारणा आहे. छोट्या व्यावसायिकांना सुलभ कर्ज मिळाल्यास त्यांच्या मनात सरकारविषयी सहानुभूती निर्माण होते, हा अनुभव राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांना उत्तर प्रदेश निवडणुकांमध्ये आला आहे.

महापालिकांकडून पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण केले जाते. त्यावेळी अनेक पथविक्रेते सर्वेक्षणातून सुटलेले होते. कर्ज घेण्यासाठी आणि त्याची परतफेड करण्यासाठी आवश्यक असणारी मानसिकता तयार करण्यासाठी काही जागृती शिबिरे घेण्याची आवश्यकता होती. तशी ती घेतली गेली नाहीत. कर्ज मिळते आहे म्हणून ते घ्या आणि परतफेड करु नका, अशी मानसिकता वाढू लागलेली आहे. छोट्या शहरांमध्ये मुद्रा व सूक्ष्म, मध्यम उद्योग योजनांचे कर्ज उचलण्यासाठी बनावट दरपत्रक देणाऱ्यांची टोळीच सक्रिय आहे.

# ख्रिस हिपकिन्स : न्यूझीलंडचे नवे पंतप्रधान




न्यूझीलंडचे माजी शिक्षण मंत्री ख्रिस हिपकिन्स यांची देशाचे नवे पंतप्रधान म्हणून २५ जानेवारे २०२३ रोजी निवड करण्यात आली. लेबर पार्टीच्या प्रतिनिधींच्या बैठकीत त्यांच्या नावाची घोषणा करण्यात आली.

कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थिती हातळण्यासाठी नोव्हेंबर २०२२ मध्ये त्यांच्याकडे मंत्रिपद देण्यात आले होते. कोरोनाच्या संकटावर मात करण्यासाठी केलेल्या उपाययोजनांमुळे हिपकिन्स यांना मोठी लोकप्रियता मिळाली. शिक्षण, सार्वजनिक सेवा आदी मंत्रिपदांबरोबरच ते सभागृहाचे नेतेही आहेत. लेबर पार्टीला त्यांनी अनेकदा राजकीय संकटांतून सहीसलामत बाहेर काढले.

न्यूझीलंडमधील एका स्थानिक माध्यमाने केलेल्या सर्वेक्षणानुसार सुमारे ३६ टक्के नागरिकांनी पंतप्रधानपदासाठी ख्रिस हिपकिन्स यांच्या बाजूने कौल दिला आहे. सुस्वभावी व्यक्तिमत्त्वामुळेही ते लोकांमध्ये सतत चर्चेत असतात.

येथे यंदा १४ ऑक्टोबरला सर्वसाधारण निवडणूक होणार आहे. तोपर्यंत आठ महिन्यांची मुदत हिपकिन्स यांच्याकडे असून लेबर पार्टीला पुन्हा सत्तेत आणण्यासाठी त्यांना कठोर परिश्रम करावे लागणार आहेत. एका ताज्या पाहणीनुसार लेबर पार्टीची लोकप्रियता घसरून ३१.७ टक्के झाला आहे. त्याचवेळी विरोधी नॅशनल पार्टीला ३७.२ टक्के लोकांचा पाठिंबा मिळाला आहे. महागाई, गरिबी आणि गुन्हेगारी या मुद्यांवरून विरोधक लेबर पार्टीच्या सरकारला लक्ष्य करीत आहेत.



# महिलांसाठी अनुकूल शहरे

स्त्री शिक्षणासाठी आणि नोकरी–उद्योग व्यवसायासाठी घराबाहेर पडू लागली. प्रवास करु लागली, तशा तिच्या गरजाही वाढल्या. या गरजांकडे अजूनही पुरेसे लक्ष दिलं जातं असं नाही. पण मोठ्या शहरांमध्ये किमान काही प्रमाणात का होईना विचार होऊ लागला आहे हे खरं आहे. अर्थात अजूनही महिलांसाठी पुरेशी स्वच्छतागृहे, कामाच्या ठिकाणी सुरक्षितता अशा अनेक सुधारणा होणं बाकी आहे, अशा निकषांचा विचार करूनच एक सर्वेक्षण करण्यात आलं. यामध्ये चेन्नई शहर हे महिलांसाठी सर्वांत चांगलं सुरक्षित शहर असल्याचं स्पष्ट झालं आहे. तर पुणे दुसऱ्या क्रमांवार आहे. त्यानंतर बंगळुरू, हैदराबाद आणि मुंबईचा क्रमांक लागतो. विशेष म्हणजे राजधानी दिल्ली यामध्ये १४ व्या क्रमांकावर आहे. देशातील राजधानीच्या फक्त १० शहरांनी पहिल्या २५ शहरांच्या यादीत स्थान मिळवलं आहे. टॅलेंट स्ट्रॅटेजी कन्सल्टींग फर्म (अवतार)च्या वतीने हा अहवाल तयार करण्यात आला आहे, यामध्ये एकूण १११ शहरांची यादी देण्यात आली आहे.

या सर्वेक्षणामध्ये फक्त महिलांची सुरक्षितता हा मुद्दा होता. पण तोच एकमेव मुद्दा नव्हता. तर यामध्ये राजकीयदृष्ट्टया, सामाजिक–आर्थिकदृष्ट्या, पर्यावरणदृष्ट्या आणि महिलांच्या विकासाच्या दृष्टीने कोणती शहरं उत्तम कामगिरी करत आहेत असे निकष होते. विशेष म्हणजे यामध्ये उत्तरेकडील राज्यांमधील शहरांपेक्षा दक्षिणेकडील शहरांनी बाजी मारल्याचं दिसून येत आहे. या संस्थेनं सर्वेक्षण करताना पाच महत्त्वाचे निकष ठेवले होते– राहण्यासाठीच्या सुविधा, सुरक्षितता, महिला प्रतिनिधित्व आणि महिला सक्षमीकरणासाठी उचलण्यात

आलेली पावले हे निकष होते. तसंच या शहरांमध्ये काम करत असलेल्या विविध संघटना आणि यापैकी किती संघटना विशेषत: महिलांसाठी काम करत आहेत हा मुद्दाही विचारात घेण्यात आला होता. दक्षिण किंवा पश्चिमेकडील राज्यांमधील राजकीय, ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता या राज्यांमध्ये महिलांना रोजगाराच्या संधी जास्त असणं स्वाभाविक आहे असं अवतार ग्रुपचे संस्थापक आणि अध्यक्ष सौंदर्य राजेश यांचं म्हणणं आहे.

महिलांना आरोग्य, शिक्षण, रोजगार संधी, नागरी, सामाजिक सुविधा आणि सुरक्षित वातावरण जी शहरे देऊ करतात ती शहरे महिलांसाठी अनुकूल शहरे समजली जातात, अशी व्याख्या संयुक्त राष्ट्रांच्या वतीनेच करण्यात आली आहे. दुर्दैवाने आपल्याकडे यापूर्वीही आणि आताही शहरांचा विकास करताना महिलांच्या काही वेगळ्या गरजा असू शकतात ही गोष्टच लक्षात घेतली जात नाही. तामिळनाडूमधील चेन्नईबरोबरच कोईमतूर आणि मदुराई या शहरांनीही पहिल्या १० शहरांमध्ये स्थान मिळवलं आहे. ज्या प्रमाणात महिला शिक्षण घेत आहेत, विविध क्षेत्रांत काम करत आहेत त्या प्रमाणात त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत का हा महत्त्वाचा प्रश्न आहे. किंवा रोजगाराच्या संधी उपलब्ध असल्या तरी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत का हाही मुद्दा आहे.

राजधानी दिल्लीचा मात्र पहिल्या १० शहरांमध्ये समावेश झालेला नाही. दिल्लीतील महिला अत्याचारांच्या घटना पाहता महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा कायमच इथं महत्त्वाचा आहे. सुरक्षिततेबरोबरच महिलांना मिळणाऱ्या संधी आणि तिथलं वातावरणही इतर शहरांच्या तुलनेत दिल्लीत बऱ्याच त्रुटी आढळल्या. पहिल्या पाच राज्यांमध्ये दक्षिण भारतातील केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटक या तीन राज्यांचा समावेश आहे. आपल्याला अभिमान वाटणारी गोष्ट म्हणजे पहिल्या पाच राज्यांमध्ये महाराष्ट्रातील पुण्याचा समावेश आहे. तर उत्तरेकडील फक्त हिमाचल प्रदेशचा यात क्रमांक आहे. दक्षिण आणि महाराष्ट्रासारख्या पश्चिमेकडील राज्यांमध्ये रोजगारासाठी महिलांना संधी मिळणं तसं नवीन नाही. त्यामुळे ती राज्यांसाठी अधिक अनुकूल आहेतच. पण या कर्नाटकमधील

हुबळी, महाराष्ट्रातील नागपूर, गुजरातमधील अहमदाबाद आणि तामिळनाडूतील कोईमतूर ही शहरं आता महिलांसाठी रोजगार संधीसाठी नवी आश्वासक शहरं ठरली आहेत. तिथे असलेल्या औद्योगिक वातावरणामुळे अधिक संधी मिळत आहेत आणि त्याचबरोबर तिथलं वातावरणही महिलांसाठी पोषक आहे. त्यामानाने दिल्ली आणि कोलकत्तासारखी महानगरं मात्र मागे आहेत. याचं कारण म्हणजे तिथं महिला सुरक्षिततेचा दर्जा कमी आहे आणि महिलांना रोजगार देण्यात ही शहरे पुरेसं पोषक वातावरण देण्यात कमी पडत आहेत.

महाराष्ट्र कायमच स्त्री शिक्षण, सामाजिक सुधारणा, महिलांना दिल्या जाणाऱ्या संधींबाबत अग्रेसर राहिला आहे. मुंबई, पुणे, नागपूरसारख्या शहरांमध्ये नोकरदार महिलांची संख्या लक्षणीय आहे. इतरही शहरांमध्ये ही संख्या वाढत आहे. मात्र त्याचबरोबरीने शहरांचं नियोजन, विस्तार करताना महिलांचाही विचार केला जाणं अत्यावश्यक ठरलं आहे. कोणत्याही शहरामध्ये महिला सुरक्षितता, महिलांच्या अत्याचाराच्या गुन्ह्यांची वेळेवर आणि तातडीनं घेतली जाणारी दखल, कारवाई या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. मुंबईसारख्या शहरांमध्ये लोकल स्टेशनवर पुरेसा बंदोबस्त असणे, रात्री उशिरा येणाऱ्याजाणाऱ्या महिलांसाठी रस्त्यांवर पुरेसे दिवे असणे, वाहतुकीची सुरक्षित साधने उपलब्ध करुन देणे, रस्त्यांवर, स्टेशन्सवर स्वच्छतागृहांची सोय हे मुद्दे लक्षात घेणं गरजेचं आहे. तसंच कामाच्या ठिकाणी महिलांसाठी सुरक्षित वातावरण, विविध संघटनांमध्ये महिलांचा सहभाग, महिलांच्या प्रश्नांवर काम करणाऱ्या संस्था याही गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.

प्रत्येक स्त्री मध्ये आत्मनिर्भर होण्याची क्षमता असते. पण आपल्याला संधी मिळू शकते, आपण सुरक्षितरित्या प्रवास करु शकतो हा विश्वास तिला तिच्या शहरामुळे येतो. त्यासाठी गरजेचं आहे निकोप, सुरक्षित वातावरण. हे वातावरण राज्यकर्ते आणि प्रशासनकर्तेच देऊ शकतात. वाहतुकीपासून ते सुरक्षिततेपर्यंतचे मुद्दे लक्षात घेऊन नियोजन केलं गेलं तर महिलांसाठी प्रत्येक शहर राहण्यासाठी अनुकूल ठरू शकतं.

●●●



# पोलर प्रीतचा विक्रम

पोलर प्रीतफ या नावाने प्रसिद्ध असलेल्या ***कॅप्टन हरप्रीत चंडी*** यांनी ध्रुवीय प्रदेशातील एकटीने, कोणत्याही प्रकारच्या मदतीशिवाय आणि साह्याशिवाय सर्वांत अधिक अंतराचा ट्रेक पूर्ण करणारी पहिली महिला म्हणून मान मिळविला आहे. कॅप्टन हरप्रीत या ब्रिटिश सैन्यदलातील महिला शीख अधिकारी आहेत. त्या ३३ वर्षाच्या आहेत.

दक्षिण ध्रुवावर एकटीने, कोणाच्याही मदतीशिवाय ट्रेक केलेली भारतीय वंशाची पहिली महिला म्हणून कॅप्टन हरप्रीत यांचे नाव २०२१ मध्ये चर्चेत आले होते. यावेळी त्यांनी अंटार्क्टिका खंडावर उणे ५० अंश सेल्सिअस तापमानात १,३९७ किलोमीटरचे अंतर ६७ दिवसांमध्ये पायी पार केले. यापूर्वी जर्मनीच्या अँजा ब्लॅका यांनी २०२० मध्ये १,३६८ किलोमीटर चालत विक्रम प्रस्थापित केला होता.

तो विक्रम कॅप्टन हरप्रीत यांनी मोडला आहे. दक्षिण ध्रुवावर ट्रेक करण्याच्या उद्देशानेच हरप्रीत यांनी तीन वर्षांपूर्वी डर्बीशायर विद्यापीठात अभ्यास केला होता. त्यांना या विद्यापीठाने मानद पदवीही बहाल केली होती. त्यामुळे हरप्रीत यांच्या यशाबद्दल या विद्यापीठाने त्यांचे अभिनंदन केले आहे. या विक्रमाची गिनेस बुकमध्येही नोंद होण्याची शक्यता आहे.

कॅप्टन हरप्रीत हा डर्बी येथे राहतात. बकिंगहॅमशायर येथे प्रादेशिक पुनर्वसन विभागात त्या नियुक्तीवर आहेत. मानवी शरीराच्या क्षमतेचा पूर्ण वापर करण्यावर हरप्रीत यांचा नेहमीच भर असतो. त्यामुळेच हा अत्यंत आव्हानात्मक ट्रेक





करण्याची प्रेरणा मिळाली, असे त्यांनी सांगितले. यापूर्वी त्यांनी अनेक मॅरेथॉन, अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये सहभाग घेतला आहे. ब्रिटिश लष्करी अधिकारी म्हणूनही त्यांनी अत्यंत शारीरिक कष्ट असलेल्या विविध लष्करी सरावांमध्ये भाग घेतला आहे. शांतिसैनिक म्हणूनही त्या दक्षिण सुदानमध्ये तैनात होत्या.

उणे ५० अंश सेल्सिअस तापमान आणि प्रतितास ९६ किमी वेगाने वाहणारे वारे अशा प्रतिकूल वातावरणात हरप्रीत यांना आपले सर्व सामान घसरत्या गाडीवरून (स्लेज) ओढून न्यावे लागत होते. हे अत्यंत दमछाक करणारे होते. हवामान अतिथंड असल्याने गोठून जाऊ नये म्हणून मी एकेठिकाणी फार काळ थांबून रहात नव्हते, असे हरप्रीत यांनी त्यांच्या ब्लॉगवर लिहिले आहे.

संपूर्ण प्रवासात केवळ बर्फाची पांढरी चादरच दिसत होती. अशा वातावरणात स्वत:चा उत्साह आणि मनोबल टिकवून ठेवण्यासाठी त्या ट्रेकदरम्यान प्रेरणा देणाऱ्या कथा, रेकॉर्ड करून ठेवलेले आई–वडिलांचे आवाज ऐकत होत्या. एकटीने अंटार्क्टिका खंड पार करायचे लक्ष्य हरप्रीत यांनी समोर ठेवले होते. मात्र, ते पूर्ण न झाल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

# पोलीस भरती लेखी परीक्षा मार्गदर्शन
# मराठी व्याकरण



## विशेषण

नामाबद्दल जो शब्द विशेष किंवा अधिक माहिती सांगतो आणि नामाची व्याप्ती मर्यादित करतो अशा विकारी शब्दास 'विशेषण' म्हणतात. ज्या नामाबद्दलची माहिती सांगितलेली असते त्याला 'विशेष्य' म्हणतात.

उदा. – उंच झाड. यात झाड हे विशेष्य आणि उंच हे विशेषण आहे. विशेषण–विशेष्य हे नेहमी जोडीने येते.

**विशेषणांचे प्रकार :**

**(१) गुणविशेषण :** जो शब्द नामाचा कोणताही गुण किंवा विशेष दाखवितो त्यास 'गुणविशेषण' असे म्हणतात. गुणविशेषण नेहमी त्याच्या विशेष्याच्या अगोदर येते. उदा. – लालचुटुक गाजर, सुंदर मुलगी, प्रेमळ आजी.

**(२) संख्याविशेषण :** ज्या विशेषणाच्या योगाने नामाची संख्या दाखविली जाते, त्या विकारी शब्दास 'संख्याविशेषण' असे म्हणतात.

**(३) विधिविशेषणे :** विशेष्याच्या किंवा नामाच्या नंतर येणाऱ्या विशेषणाला 'विधिविशेषण' असे म्हणतात. उदा. – तो मुलगा प्रामाणिक आहे. ते वासरू अशक्त आहे. या वाक्यांमध्ये विशेषणे विशेष्यांच्या नंतर आलेली आहेत.

**संख्याविशेषणाचा प्रकार**

| *प्रकार* | *व्याख्या* | *उदाहरण* |
|---|---|---|
| १) गुणवाचक | अंकात मोजण्यासाठी | सप्तऋषी, अठरा विश्व, चौसष्ट कला, चार वेद |
| (अ) पूर्णांकवाचक | पूर्ण अंकात गणना | आठ केळी, दोन डोळे, पाच बोटे, पास मुली. |
| (ब) अपूर्णांकवाचक | अपूर्णांकात गणना | १/२ लिटर दूध, १/४ किलो रवा, पाव किलो तूप |
| (क) साकल्यवाचक | असलेल्या वस्तूंपैकी सर्व | तुम्ही उभयता, आपण सर्व, तुम्ही चौघेही |
| २) क्रमवाचक | वस्तूंचा क्रम दाखविणे | सातवे घर, पहिला चौक, तिसरी इमारत, सातवा मजला |
| ३) आवृत्तिवाचक | किती वेळा याचा बोध | त्रिवार मुजरा, शतश: प्रणाम, नऊवारी साडी |
| ४) पृथकत्ववाचक | वेगवेगळेपणाचा बोध | तीनतीन मुली, दोनदोन फुले, एकेक नारळ |
| ५) अनिश्चित | निश्चित संख्या नसते | पुष्कळ लोक, काही माणसे, सगळे घरचे, बरीच घरे. |

**(४) सार्वनामिक विशेषणे :** जी विशेषणे सर्वनामांपासून तयार होऊन नामांबद्दल विशेष माहिती सांगतात त्यांना 'सार्वनामिक विशेषणे' किंवा 'सर्वनामसाधित विशेषणे' असे म्हणतात. मूळ सर्वनामे व त्यापासून तयार झालेली काही सार्वनामिक विशेषणे पुढीलप्रमाणे –

| *मूळ सर्वनाम* | *सार्वनामिक विशेषणे* |
|---|---|
| मी | माझी, माझा, माझे |
| तू | तुझी, तुझा, तुझे |
| आम्ही | आमचा, आमची, आमचे |
| तुम्ही | तुमचा, तुमची, तुमचे |
| तो | त्याचा, त्याची, त्याचे |
| ती | तिचा, तिची, तिचे |
| ते | त्याचा, त्याची, त्याचे |
| हा | असा, इतका, असला, एवढा, अमुक, याचा, अमका |
| तो | तसला, तसा, तितका, तेवढा, तमका |
| जो | जसा, जसला, जितका, जेवढा |
| कोण | कोणती, कोणता, कोणते, केवढा |
| काय | कसा, कसला. |

**(५) नामसाधित विशेषणे :** नामांपासून बनणाऱ्या विशेषणांस 'नामसाधित विशेषणे' असे म्हणता येईल.

| *नाम* | *विशेषण* | *नाम* | *विशेषण* |
|---|---|---|---|
| पुणे | पुणेरी | बुद्धी | बुद्धीमंत |
| धन | धनवान | दया | दयाळू |
| गुण | गुणवान | तेल | तेलकट |
| लाज | लाजाळू | व्यथा | व्यथित |
| मन | मानसिक | ऐट | ऐटदार |
| शौर्य | शौर्यशाली | बल | बलिष्ठ |

| | | | |
|---|---|---|---|
| पिष्ट | पिष्टमय | इच्छा | इच्छित |
| शास्त्र | शास्त्रीय | राग | रागीट |
| कला | कलावंत | हास्य | हास्यास्पद |
| तऱ्हा | तऱ्हेवाईक | मोह | मोहमयी |
| जल | जलमय | मळ | मळकट |
| चव | चविष्ट | धैर्य | धैर्यशाली |
| कृपा | कृपाशील | समाज | सामाजिक |
| बनारस | बनारसी | विलास | विलासी |
| प्रतिभा | प्रतिभावंत | सातारा | सातारी |
| व्यवहार | व्यावहारिक | शरीर | शारीरिक |
| समाधान | समाधानी | | |

**(६) धातुसाधित विशेषणे :** रांग, वाह, हस, पेट, बोल, पिक यांसारख्या धातुंपासून बनलेली रांगता, वाहती, हसरे, पेटता, बोलकी, पिकलेला यांसारखी विशेषणे मराठीत प्रचलित आहेत. जसे – रडका मुलगा, चालती गाडी, खेळता पैसा, वाहते पाणी, हसरे मूल, बोलके डोळे.

**(७) अव्ययसाधित विशेषणे :** वर, खाली, मागे, पुढे, यांसारख्या अव्ययांपासून बनलेली विशेषणे मराठीत प्रचलित आहेत. जसे – वरचा मजला, मागील अंगण, पुढील भाग.

## क्रियापद

क्रियापद म्हणजे वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा क्रियावाचक शब्द होय. क्रियापद या शब्दातील 'पद' याचा अर्थ 'शब्द' असा आहे, मग क्रियापद या शब्दाचा अर्थ 'क्रिया दाखविणारा शब्द' असा होईल. परंतु फक्त क्रियेचा बोध करून देणाऱ्या शब्दाला क्रियापद म्हणत नाहीत. उदा. – संदीप रात्री अभ्यास करून झोपतो. यामध्ये क्रिया दाखविणारे शब्द दोन आहेत– १) अभ्यास करून, २) झोपतो. अभ्यास करण्याची व झोपण्याची अशा दोन क्रिया या वाक्यात दाखविलेल्या असल्या तरी 'अभ्यास करून' या क्रियावाचक शब्दाने

वाक्याचा अर्थ पूर्ण होत नाही, तर 'झोपतो' या क्रियावाचक शब्दाने वाक्याचा अर्थ पूर्ण होतो. म्हणून'झोपतो' हे क्रियापद आहे.

**धातू :** क्रियापदातील प्रत्ययरहित मूळ शब्द म्हणजे धातू. उदा. – करतो, जावे, जिंकली, बोलेल या क्रियापदात अनुक्रमे 'कर', 'जा', 'जिंक', 'बोल' हे धातू आहेत.

धातूला विविध प्रत्यय लावून क्रियापदाची विविध रूपे तयार होतात. ही रूपे क्रिया अपुरी दाखविणारी असतात म्हणून त्यांना 'धातुसाधिते' किंवा 'कृदंत' म्हणतात.

उदा. – बस – बस–तो, बस–ल्यावर.

क्रियापदांचे खालील प्रमुख प्रकार मानले जातात–

**(१) सकर्मक क्रियापदे :** ज्या क्रियापदांचा अर्थ पूर्ण होण्यासाठी कर्माची आवश्यकता असते, त्या क्रियापदांना 'सकर्मक क्रियापदे' असे म्हणतात.

उदा.–१) गवळी धार काढतो. २) सचिन क्रिकेट खेळतो.

**(२) अकर्मक क्रियापदे :** ज्या क्रियापदांना कर्माची आवश्यकता नसते, त्या क्रियापदांना 'अकर्मक क्रियापदे' असे म्हणतात. उदा. –

१) मी रस्त्यात पडलो. २) उषा जोरात पळते.

**(३) द्विकर्मक क्रियापद :** काही क्रियापदांना दोन कर्मे असतात. उदा. – आजीने नातीला गोष्ट सांगितली. या वाक्यात 'गोष्ट' हे प्रत्यक्ष कर्म आहे, तर 'नातीला' हे अप्रत्यक्ष कर्म आहे. कारण 'कोणाला' याचे उत्तर 'नातीला' हे आहे. म्हणून सांगितली या क्रियापदाची दोन कर्मे असल्यामुळे या क्रियापदाला 'द्विकर्मक क्रियापद' म्हणतात. उदा. –

१) अझरने नयनला चेंडू दिला.

२) गुरुजी मुलांना नकाशा दाखवितात.

**(४) संयुक्त क्रियापद :** क्रियेचा अर्थपूर्ण करण्यासाठी वाक्यात मुख्य क्रिया दर्शविणाऱ्या शब्दाच्या रूपाला जोडून जे दुसरे क्रियापद येते, त्यास 'साहाय्यक क्रियापद' असे म्हणतात. तर मुख्य क्रिया दर्शविणाऱ्या शब्दाचे रूप व साहाय्यक क्रियापद या दोन्हीला मिळून 'संयुक्त क्रियापद' असे म्हणतात. उदा. –

क्रीडांगणावर मुले खेळू लागली. आपणही खेळू. यातील दुसऱ्या वाक्यातील 'खेळू' या क्रियावाचक शब्दाने वाक्याचा अर्थ पूर्ण होतो, म्हणून ते क्रियापद. परंतु पहिल्या वाक्यातील 'खेळू' हा शब्द खेळण्याची क्रिया दाखवितो, पण तो वाक्याचा अर्थ पूर्ण करत नाही. ते धातुसाधित आहे. या धातुसाधितांचा अर्थ पूर्ण करण्यासाठी 'लागली' हे क्रियापद वापरले आहे.

**असणे, जाणे, होणे, देणे, लागणे, टाकणे इ. क्रियापदे साहाय्यक क्रियापदे आहेत.**

**(५) साधित क्रियापदे :** नामे, विशेषणे, क्रियापदे व अव्यये यांना प्रत्यय लागून बनलेल्या 'पाणाव' ('पाणी' या नामाला प्रत्यय), 'हाताळ' ('हात' या नामाला प्रत्यय), 'स्थिराव' ('स्थिर' या विशेषणाला प्रत्यय), 'आणव' ('आण' या धातूला प्रत्यय), 'पुढार' ('पुढे' या अव्ययाला प्रत्यय यांसारख्या शब्दांपासून साधलेल्या पाणावले, हाताळला, स्थिरावली, आणवला, पुढारले यांसारख्या क्रियापदांना 'साधित क्रियापदे' असे म्हणतात.

**(६) प्रयोजक क्रियापदे :** जेव्हा कोणीतरी एखादी क्रिया दुसऱ्याकडून करवून घेतो, तेव्हा ती क्रिया दर्शविणाऱ्या क्रियापदाला 'प्रयोजक क्रियापद' असे म्हणतात. उदा.–

१) मला तिने सोडविले. २) आईने मुलाला हसवले.

**(७) शक्य क्रियापदे :** जेव्हा एखाद्या क्रियापदावरून कार्याच्या संदर्भात शक्यता किंवा सामर्थ्य यांचा बोध होतो तेव्हा त्या क्रियापदाला 'शक्य क्रियापद' म्हणतात. उदा.–

१) त्या आजारी मुलीला आता थोडे बसवते.

२) हरीला दिवसा सूर्याकडे पहावते.

**(८) अनियमित क्रियापदे :** मराठीत असे काही धातू आहेत की त्यांना काळांचे व अर्थांचे (= आख्यातांचे) सर्व प्रत्यय न लागता ते थोड्या वेगळ्याच प्रकारे चालतात. त्यांना 'गौण किंवा अनियमित क्रियापदे' म्हणतात. 'आहे, नाही, नव्हे, पाहिजे, नको, नये, नलगे' या क्रियापदांची रूपे अशा प्रकारची आहेत. त्यांची मूळ रूपे क्रियापदेच असून त्यात

अमुक एक धातू आहे असे निश्चितपणे सांगता येत नाही. म्हणून त्यांना अनियमित क्रियापदे म्हणतात. उदा.–

१) इथून उडी मारू नको. २) खरे बोलले पाहिजे.

**(९) भावकर्तृक क्रियापदे :** क्रियापद म्हटले की, त्यात क्रिया आली व ती क्रिया करणारा वाक्यात कोणीतरी (कर्ता) असावाच लागतो. उदा. –

१) बाबा घरी येण्यापूर्वीच सांजावले.

२) उजाडले तेव्हा सात वाजले होते.

वरील वाक्यांतील 'सांजावले,वाजले होते' ही क्रियापदे अशी आहेत की त्यांचे कर्ते वाक्यात स्वतंत्रपणे दिसत नाहीत. वरील वाक्यातील 'सांजावले' याचा अर्थ 'सांज झाली', वगैरे.

या शब्दातील क्रियेचा मूळ अर्थ म्हणजे भाव. तोच त्याचा कर्ता मानावा लागतो. अशा क्रियापदांना भावकर्तृक क्रियापदे म्हणतात. या क्रियापदांचा कर्ता वाक्यात स्पष्ट नसतो म्हणून काही व्याकरणकार यांना 'अकर्तृक क्रियापदे' असे म्हणतात. भावकर्तृक क्रियापदात कर्ता हा क्रियापदातच सामावलेला असतो.

## लिंगविचार

नामाच्या रूपावरून एखादी वस्तू वास्तविक अगर काल्पनिक पुरुषजातीची आहे की स्त्री जातीची आहे, की दोन्हीपैकी कोणत्याच जातीची नाही असे ज्यावरून कळते त्याला त्याचे लिंग असे म्हणतात. मराठीत लिंगे तीन मानतात : (१) पुल्लिंग (२) स्त्रीलिंग (३) नपुंसकलिंग

मराठीत एकाच अर्थाचे शब्द तीन वेगळ्या लिंगांत आढळतात. जसे –

(१) रुमाल (पु.) पगडी (स्त्री.) पागोटे (नपुं.)

(२) ग्रंथ (पु.) पोथी (स्त्री.) पुस्तक (नपुं.)

(३) देह (पु.) काया (स्त्री.) शरीर (नपुं.)

मराठीत लिंगव्यवस्था ही अत्यंत अनियमित व धरसोडीची आहे. त्यामागे काही विशिष्ट तत्त्व असे दिसत नाही. एखादा नियम सांगावा तर त्याला अपवादच जास्त.

मग मराठीत लिंग ओळखण्याची पद्धत कोणती? प्राणिमात्रांतील पुरुष किंवा नर यांचा उल्लेख आपण 'तो' या शब्दाने करतो व स्त्री किंवा मादी यांचा उल्लेख आपण 'ती' या शब्दाने करतो. जसे –

तो बाप – ती आई    तो घोडा – ती घोडी

सजीव प्राण्यांतील एखादा नर आहे की मादी हे निश्चित सांगता येत नसेल, त्याला नपुंसकलिंगी मानून त्याचा उल्लेख 'ते' या शब्दाने करतो. जसे –

ते कुत्रे    ते वासरू    ते पाखरू

**लिंगभेदामुळे नामांच्या रूपांत होणारा बदल :**

**(१) 'आ'कारान्त पुल्लिंगी प्राणिवाचक नामांचे स्त्रीलिंगी रूप 'ई'कारान्त व नपुंसकलिंगी रूप 'ए'कारान्त होते. उदा.–**

| *पु.* | *स्त्री.* | *नपुं.* |
|---|---|---|
| मुलगा | मुलगी | मुलगे |
| पोरगा | पोरगी | पोरगे |
| कुत्रा | कुत्री | कुत्रे |
| घोडा | घोडी | घोडे |

**(२) काही प्राणिवाचक पुल्लिंगी शब्दांस 'ईण' प्रत्यय लागून त्यांची स्त्रीलिंगी रूपे होतात. उदा. –**

सुतार – सुतारीण    वाघ – वाघीण

पाटील – पाटलीण    माळी – माळीण

**(३) काही प्राणिवाचक अकारान्त पुल्लिंगी नामांची स्त्रीलिंगी रूपे ई–कारान्त होतात. उदा. –**

हंस – हंसी    दास – दासी

गोप – गोपी    तरुण – तरुणी

**(४) काही आ–कारान्त पुल्लिंगी पदार्थवाचक नामांना 'ई' प्रत्यय लागून त्यांची लघुत्वदर्शक स्त्रीलिंगी रूपे बनतात.**

गाडा – गाडी    लोटा – लोटी

खडा – खडी    दांडा – दांडी

**(५) संस्कृतातून मराठीत आलेल्या नामांची स्त्रीलिंगी रूपे ई–लागून होतात. उदा. –**

श्रीमान – श्रीमती   राजा – राणी

भगवान – भगवती युवा – युवती

**(६) काही शब्दांची स्त्रीलिंगी रूपे स्वतंत्ररीतीने होतात. उदा. –**

खोंड – कालवड    पिता – माताबोका – भाटी

भाऊ – बहीण    बैल – गाय  पती – पत्नी

मोर – लांडोर    राजा – राणीरेडा – म्हैस

वर – वधू    बोकड – शेळी    बाप – आई

नवरा – बायको    मुलगा – सून    दीर – जाऊ

पुत्र – कन्या    सासरा – सासू    पुरुष – स्त्री.

**(७) मराठीतील काही शब्द निरनिराळ्या लिंगांतही आढळतात. उदा. –**

बाग (पु. स्त्री.)    ढेकर (पु. स्त्री.)

वेळ (पु. स्त्री.)    हरीण (पु. नपुं.)

वीणा (पु. स्त्री.)    तंबाखू (पु. स्त्री.)

मजा (पु. स्त्री.)    व्याधी (पु. स्त्री.)

पोर (पु. स्त्री. नपुं.)    संधी (पु. स्त्री.)

मूल (पु. स्त्री. नपुं.)    नेत्र (पु. नपुं.)

**(८) परभाषेतून आलेल्या शब्दाचे लिंग त्याच अर्थाच्या मराठी शब्दाच्या लिंगावरून सामान्यत: ठरवितात. उदा. –**

बूट (जोडा ) पु.    बुक (पुस्तक) नपुं.

पेन्सिल (लेखणी) स्त्री.    कंपनी (मंडळी) स्त्री.

क्लास (वर्ग) पु.    ट्रंक (पेटी) स्त्री.

**(९) सामासिक शब्दांचे लिंग हे शेवटला येणाऱ्या शब्दाच्या लिंगाप्रमाणे असते. उदा. –**

साखरभात (पु.)    भाजीपाला (पु.)

मीठभाकरी (स्त्री.)    भाऊबहीण (स्त्री.)

गायरान (नपुं.)		देवघर (नपुं.)

**(१०) मासा, गरूड, पोपट, साप, टोळ, सुरवंट हे शब्द पुल्लिंगी व स्त्रीलिंगी असूनही त्यांचा उल्लेख पुल्लिंगीच करतात, तर घार, मैना, सुसर, घूस, ऊ, पिसू, जळू हे शब्द पुल्लिंगी असूनही त्यांचा उल्लेख स्त्रीलिंगी करतात.**

## वचनविचार

नामांच्या व इतर शब्दांच्या ठिकाणी संख्या दाखवणारा जो धर्म असतो त्यास वचन म्हणतात. वचनामुळे नामांस विकार घडतात. वचनामुळे क्रियापदासही विकार होतो. उदा.–

मुलगा पुस्तक वाचतो. मुलगे पुस्तक वाचतात.

मराठीत दोन वचने आहेत. कोणतेही नाम जेव्हा एकच वस्तू सूचित करते तेव्हा ते एकवचन असते.

जेव्हा नामाच्या रूपावरून एकापेक्षा अधिक वस्तूंचा बोध होतो तेव्हा ते अनेकवचन किंवा बहुवचन असते.

| *एकवचनी नामे* | *अनेकवचनी नामे* |
|---|---|
| पुस्तक | पुस्तके |
| मुलगा | मुलगे |

**अनेकवचनांची माहिती**

| *आकारान्त अनेकवचन* | *ईकारान्त अनेकवचन* | *आकारान्त व ईकारान्त अनेकवचन* |
|---|---|---|
| आत – आता | भिंत – भिंती | झेप – झेपा – झेपी |
| माळ – माळा | बोर – बोरी | करमणूक – करमणुका – करमणुकी |
| शीर – शिरा | पोर – पोरी | ढाल – ढाला – ढाली |
| जट – जटा | रीत – रीती | चोंच – चोंचा, चोंची |
| सून – सुना | मूठ – मुठी | |
| गार – गारा | गाठ – गाठी | |
| तार – तारा | आग – आगी | |
| नाव – नावा | वात – वाती | |
| गुंज – गुंजा | | |
| शिंप – शिंपा | | |
| *या गटास 'आतेचा गण' असेही नाव आहे.* | *या गटास 'भिंतीचा गण' असे नाव आहे.* | *या गटास 'झेपेचा गण' असे म्हणतात.* |

| | |
|---|---|
| आंबा | आंबे |
| पाटी | पाट्या |
| पैसा | पैसे |

**वचनांच्या बाबतीत काही स्थूल नियम दिसतात.–**

(१) आकारान्त पुल्लिंगी नामाशिवाय इतर अंतांची सर्व पुल्लिंगी नामे अविकृतच राहतात. म्हणजे बदलत नाहीत. उदा. – खांब, हत्ती, पेरू, लाडू, गडू, शत्रू, देव, मनुष्य, बैल.

(२) आकारान्त पुल्लिंगी नामांचे अनेकवचन ए कारान्त होते. उदा. – घोडा – घोडे, मुलगा – मुलगे, रस्ता – रस्ते, राजा – राजे. नाना, दादा, बाबा, आप्पा इत्यादी नाती दाखविणारे प्रतिष्ठावाचक शब्द अविकृतच राहतात.

(३) अकारान्त स्त्रीलिंगी नामांचे अनेकवचन आकारान्त, ईकारान्त व काहींचे दोन्ही प्रकारांनी होते.

(४) आकारान्त स्त्रीलिंगी नामे अनेकवचनात अविकृतच राहतात. उदा. – विद्या – विद्या, भाषा – भाषा, आशा – आशा, आज्ञा – आज्ञा, कन्या – कन्या

(५) ईकारान्त व उकारान्त स्त्रीलिंगी नामे अविकृतच राहतात. उदा. – मति – मति, बुद्धी – बुद्धी, धेनु – धेनु.

(६) ईकारान्त स्त्रीलिंगी नामांचे अनेक वचन आकारान्त होते. उदा. – नदी – नद्या, काठी – काठ्या, भाजी – भाज्या, साडी – साड्या, माडी – माड्या.

(७) जी ईकारान्त स्त्रीलिंगी नामे मूळ आकारान्त किंवा व्यंजनात शब्दांपासून आली आहेत ती अविकृतच राहतात. उदा. – गोप – गोपी, गोपी देव – देवी, देवी नर – नारी, नारी दास – दासी, दासी

(८) काही ईकारान्त शब्दांचे अनेकवचन याकारान्तही होते. उदा. – बाई – बाया, समई – समया, बी – बिया

(९) ऊकारान्त स्त्रीलिंगी नामांस कधी आ, कधी अव् प्रत्यय लागून अनेकवचन होते. उदा. –

उ – उवा सासू – सास्वा जळू – जळवा

कित्येक वेळा ही अविकृतही राहतात. उदा. –

वधू–वधू, बाजू – बाजू, टाळू – टाळू, वाळू – वाळू

(१०) ओकारान्त स्त्रीलिंगी नामांचे अनेकवचन अकारान्त होते. उदा. – बायको – बायका

(११) अकारान्त नपुंसकलिंगी नामांचे अनेकवचन एकारान्त होते. उदा.– घर – घरे, दार – दारे, पान – पाने

(१२) आकारान्त नपुंसकलिंगी नामे मराठीत नाहीत.

(१३) ईकारान्त नपुंसकलिंगी नामांची अनेकवचने एकारान्त होतात. उदा. –मोती – मोत्ये, मिरी – मिऱ्ये, मिरे

(१४) ऊकारान्त नपुंसकलिंगी नामांची अनेकवचने एकारान्त होतात. उदा. –

लेकरू – लेकरे वासरू – वासरे

पाखरू – पाखरे लिंबू – लिंबे

(१५) एकारान्त नपुंसकलिंगी नामांची अनेकवचने ईकारान्त होतात. उदा. – तळे – तळी कुत्रे – कुत्री केळे – केळी देणे – देणी बोलणे – बोलणी मडके – मडकी

(१६) काही नामे नेहमी अनेकवचनी असतात. उदा.

| | | | |
|---|---|---|---|
| चिपळ्या | खडावा | आट्यापाट्या | क्लेश |
| देवी | कांजिण्या | शहारे | आढेवेढे |
| डोहाळे | रोमांच | लोक | |

(१७) पदार्थाचे वैपुल्य दाखविण्यासाठी कधी कधी एकवचनाचा प्रयोग करतात. उदा. –

१) यंदा यात्रेला एक लाख माणूस लोटले होते.

२) मंडईत आज काय आंबा आला आहे.

३) त्याचे जवळ पैसा फार आहे.

(१८) आदर दर्शविण्यासाठी अनेकवचनाचा उपयोग होतो. उदा. – १) शिक्षक शाळेत आहेत.

(१९) काही नामे नेहमी एकवचनीय असतात. त्यांचे अनेकवचन होत नाही. उदा. – दूध, दही, तेल, लोणी

(२०) काही समूहवाचक शब्द अनेक वस्तूंचा निर्देश करीत असले तरी त्यांचा प्रयोग एकवचनीय असतो. उदा.–

| | | | |
|---|---|---|---|
| रास | ढीग | समिती | मंडळ |
| पंचायत | शहर | गाव | सैन्य |

## विभक्ती

वाक्यात शब्दाशब्दांतील संबंध हा प्रत्ययांनी दाखविले जातात. नामाचा किंवा सर्वनामाचा क्रियापदाशी जो संबंध असतो त्याला 'कारक संबंध' आणि त्या विभक्तीला 'कारक विभक्ती' असे म्हणतात. विभक्तीच्या रूपांमुळे वाक्यातील शब्दाशब्दांतील जे संबंध किंवा जी नाती जोडली जातात त्यालाच 'विभक्तींचे अर्थ' असे म्हणतात. नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशी जे संबंध येतात त्यांनाच 'कारकार्थ' असे म्हणतात.

**कारक अर्थ :**

१) क्रियापद हा वाक्यातील प्रमुख शब्द. या शब्दाने दर्शविलेली क्रिया करणारा जो असतो त्यास कर्ता असे म्हणतात. कर्त्याची विभक्ती बऱ्याच वेळा प्रथमा असते. प्रथमेचा प्रमुख कारकार्थ – 'कर्ता'.

२) क्रिया कोणावर घडली हे सांगणारा शब्द 'कर्म' = कर्माची विभक्ती द्वितीया. म्हणून द्वितीयेचा कारकार्थ = कर्म

३) वाक्यातील ज्याच्या साहाय्याने घडते त्याला 'कारण' असे म्हणतात. क्रियेचे साधन म्हणजे करण. तृतीयेचा मुख्य कारकार्थ करण.

४) 'क्रिया' ही जेव्हा काही 'देण्याचा, दानाचा, बोलण्याचा सांगण्याचा' अर्थ व्यक्त करते आणि ती क्रिया ज्याला उद्देशून घडतात त्याला 'संप्रदान' असे म्हणतात. तिथे चतुर्थी विभक्ती व तिचा कारकार्थ (संप्रदान – दान) असा असतो.

५) क्रियेच्या संबंधात ज्याच्यापासून एखाद्या वस्तूचा वियोग दाखवायचा असतो त्यालाच 'अपादान' म्हणतात. या शब्दाची विभक्ती पंचमी व पंचमीचा कारकार्थ – अपादान = (वियोग) असतो.

६) षष्ठी विभक्तीचा संबंध क्रियापदाशी येत नाही तर तो दुसऱ्या नामाशी येतो. षष्ठीचा कारकार्थ = संबंध.

७) वाक्यातील क्रिया कोठे व केव्हा घडली असे क्रियेचे स्थान व काळवेळ दाखविणाऱ्या संबंधास 'अधिकरण' म्हणतात. याचा विभक्ती सप्तमी व सप्तमीचा कारकार्थ – अधिकरण यावरून विभक्तीचे मुख्य अर्थ – (१) कर्ता (२) कर्म (३) करण (४) संप्रदान (५) अपादान (६) संबंध (७) अधिकरण (८) संबोधन.

संबोधनाचा उपयोग हाक मारण्यास होतो. म्हणून ही आठवी विभक्ती मानतात.

विभक्तीचे प्रत्यय विभक्ती आणि कारकार्थ पुढीलप्रमाणे–

**विभक्तीची रूपे**

| *विभक्ती* | *प्रत्यय* | *कारकार्थ* | *उदाहरणे* |
|---|---|---|---|
| प्रथमा – | प्रत्यय नाहीत. | कर्ता | तानाजी हा पराक्रमी होता. |
| द्वितीया – | स, ला, ना, ते. | कर्म | शेतकरी गायीस बांधतो. |
| तृतीया – | ने, ए, शी, नी | करण | चाकूने कागद कापले. |
| चतुर्थी – | स, ला, ना, ते | संप्रदान | लक्ष्मणाने रामाला फुले दिली. |
| पंचमी – | ऊन–हून | अपादान | आम्ही शाळेतून बाहेर पडतो. |
| षष्ठी – | चा, ची, चे, च्या | संबंध | त्याच्या वागण्याचा राग आला. |
| सप्तमी – | त, ई, आ | अधिकरण | सुखदा सकाळी येईल. |
| संबोधन – | – | हाक मारणे | कृष्णा, हे पुस्तक घे. |